परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी - **411018**
क्र.मातवि/**8**/कावि/232/19
दिनांक- 29. / **08** /2019

प्रति,
सर्व संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८

विषय:- मनपा संकेतस्थळावरील सर्व सेवांचे असलेले जुने अर्ज नमुने नव्याने अद्ययावत करणेबाबत...

संदर्भ:- दिनांक 01/08/2019 रोजी झालेल्या आढावा बैठकीचा सभावृत्तांत.

उपरोक्त संदर्भिय सभावृत्तांतास अनुसरुन सर्व विभागांना कळविणेत येते की, आपले विभागाशी संबंधित नागरिकांना देणेत येत असलेल्या विविध सेवांचे अर्ज नागरिकांना त्वरित उपलब्ध होणेकामी 1) मनपाचे वेबसाईटवर " Download ( डाऊनलोड) या सदराअंतर्गत 2) CFC संगणक प्रणाली 3) विविध विभागांसाठी विकसित करणेत आलेल्या संगणक प्रणालीं इत्यादी ठिकाणी Upload करणेत आलेले आहेत. तथापी तद्नंतर बहुतांश विभागांनी आपले विभागांशी संबंधित अर्जांमध्ये तसेच आवश्यक जोडावयास लागणा-या कागदपत्रांच्या यादीमध्ये बदल केलेले आहेत. याबाबत नागरिक तसेच नागरी सुविधा केंद्र चालक यांनी महापालिकेच्या निदर्शनास आणुन दिलेले आहे. तसेच विवाह नोंदणी करिता विविध क्षेत्रिय कार्यालयात वेगवेगळ्या स्वरुपाची कागदपत्रांची मागणी केली जात आहे. याबाबत सर्वसमावेशक सुसुत्रता राहणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी विवाह नोंदणी अर्ज व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे याबाबत एकत्रित सर्वसमावेशक अर्ज नमुना तयार करावा.

तथापी, या परिपत्रकान्वये सर्व संबंधित विभागांना कळविणेत येते की, आपले विभागाशी संबंधित जे अर्ज नागरिकांसाठी वेबसाईटवर उपलब्ध करुन दिलेले आहेत त्यांचे अवलोकन करुन त्यामध्ये काही बदल असल्यास सुधारित अर्ज त्वरित वेबसाईटवर Upload करणेची कार्यवाही करणेत यावी. तसेच नव्याने अपलोड करण्यात आलेल्या अर्जांची नमुना प्रत व Soft Copy माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे सादर करावी.

अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.